मूल्य चार रुपये

Reg. No. RNP/NP CITY/236/2012-14
Without Prepayment of Postage
No. RNP/NP CITY/WPP/28/2012-14.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

नं. २९] गुरुवार, दिनांक २० सप्टेंबर २०१२/भाद्रपद २९, शके १९३४

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ-नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (ना.वि.पु.) म.शा.रा. अ.क्र. १४९

### सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, यांजकडून

स्टेशन रोड, सदर, नागपूर-४४० ००१.

नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम, १९३६ च्या कलम ३९ अन्वये

(खडका-किरमीटी-शिवमडका-सुमठाना-पांजरी सुधार योजना, तह. हिंगणा, जिल्हा नागपूर)

क्रमांक उपसंनर-५२९९-२०१२.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाची अधिसूचना क्रमांक टिपीएस-१८९९-११९१-प्र.क्र.८०-९९-नवि-१३, दिनांक २३-७-१९९९ अन्वये 'नागपूर महानगर' क्षेत्र घोषीत करण्यात आले व शासनाचे अधिसूचना क्रमांक एन.आय.टी २२०२-४०२५-सी.आर.-४९३-२००२-नवि-२६, दिनांक २४-१२-२००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासचे कार्यक्षेत्र नागपूर महानगर क्षेत्रापर्यंत विस्तारित करण्यात आले आणि महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ३१-८-२०१० च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (१) व ४० (१ख) अन्वये नागपूर महानगर क्षेत्रासाठी नागपूर सुधार प्रन्यास ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे व नागपूर सुधार प्रन्यासने दिनांक २२-२-२०१० रोजी ठराव क्र. १८-१०८५-२२-२-२०१०-अ.अ.-ज.स.प. द्वारे नागपूर महानगर क्षेत्राचा विकास "जनता सहयोग" पद्धतीवर करण्याचे ठरविण्यात आले आहे व दिनांक ३०-८-२०११ रोजी ठराव क्र. ८-१०९९-३०-८-२०११-अ.अ.-ज.रा. अन्वये नागपूर महानगर क्षेत्राच्या तालुका हिंगणा येथील "खडका-किरमीटी-शिवमडका-सुमठाना-पांजरी" सुधार योजना राबविण्याचे ठराव पारित केले आहे आणि नागपूर सुधार प्रन्यास विश्वस्त मंडळ ठराव क्र. १८-१०८५, दिनांक २२-२-२०१० द्वारे ही योजना नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम, १९३६ च्या कलम ३९ अन्वये प्रसिद्ध करण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी, असे अधिसुचित करण्यात येते कि,—

अ. मौजा खडका, किरमीटी, शिवमडका, सुमठाना व पांजरी, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर या भागाचा सुनियोजीत विकास साधण्याच्या दृष्टीने "खडका-किरमीटी-शिवमडका-सुमठाना-पांजरी" प्रारुप सुधार योजना तयार करण्यात आली असून योजनेखालील येणाऱ्या क्षेत्राच्या सीमा खालील अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे आहेत.

ब. **उत्तर-सीमा** :-मौजा खडका, तहसिल हिंगणा येथील खसरा क्र. ५९, ५८, ५६, ५५, २५, ३०, ३१, १ गावठाण, खसरा क्र. १६२, १६३, १६४ व १६५ ची उत्तर हद्द मौजा सुमठाणा, तहसिल हिंगणा येथील खसरा क्र. १३१ ची उत्तर हद्द.

**दक्षिण-सीमा**:-मौजा किरमीटी, तहसिल हिंगणाची दक्षिण हद्द, मौजा शिवमडका, तहसिल हिंगणा येथील खसरा क्र. ३२, ३३, ३४अ, ३४ब, ३५, ३६अ, ३९, ४०, ४१, ४३, ४४, ४५, ४६, ९५, ९४, ७२ व ७० ची दक्षिण हद्द.

पूर्व-सीमा:-मौजा सुमठाणा, तहसिल हिंगणा मधील खसरा क्र. १३१, १३०, १२९ ची पूर्व हद्द व मौजा खडका, तहसिल हिंगणा येथील खसरा क्र. १४७, १४६, १४५, १४४, १४३ व १४२ ची पूर्व हद्द व मौजा शिवमडका, तहसिल हिंगणा येथील खसरा क्र. ६९ व ७० ची पूर्व हद्द.

**पश्चिम-सिमा** :-मौजा किरमीटी व मौजा खडका, तहसिल हिंगणाची पश्चिम सीमा, मौजा पांजरी येथील खसरा क्र. १८९, १९०, १९७ ची पश्चिम हद्द व स.नं. १९१-१ व १९१-२ ची उत्तर हद्द.

क. वर उल्लेखित योजनेविषयीची तपशीलवार माहिती, योजनेअंतर्गत समाविष्ट जमिनींचा तपशील, प्रारुप योजनेचा प्रस्तावीत जमीन वापर नकाशा, विकास नियंत्रण नियमावली व योजनेअंतर्गत समायोजित करावयाच्या जमिनींचा तपशील तसेच विकास निधी (Net Demand) वसूल करावयाच्या जमिनीसंबंधीची माहिती *www.nitnagpur.org* या संकेत स्थळावर उपलब्ध आहे व खालील ठिकाणीसुद्धा जनतेच्या अवलोकानासाठी कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

(१) उपसंचालक, नगर रचना, दुसरा माळा, नागपूर सुधार प्रन्यास, सदर, नगपूर.

(२) उपसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, जुने सचिवालय, नागपूर.

(३) सहाय्यक संचालक, नगर रचना, शाख कार्यालय, प्रशासकीय इमारत क्र.१, दुसरा माळा, नागपूर.

(४) जिल्हाधिकारी कार्यालय, सिव्हील लाईन्स, नागपूर.

(५) मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर.

(६) तहसिलदार, हिंगणा तहसिल, जिल्हा नागपूर.

सबब उक्त अधिनियमाच्या कलम ३९ अन्वये उपरोक्त योजनेतील प्रस्तावाबाबत जनतेकडून आक्षेप/सूचना मागविण्यास्तव अधिसूचना प्रकाशित करण्यात येत आहे. ही सूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रथम प्रकाशीत झाल्याचे तारखेपासून ६० दिवसांचे आंत उपरोक्त प्रस्तावासंबंधात ज्या सूचना/आक्षेप उपसंचालक, नगर रचना, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना प्राप्त होतील त्या नागपूर सुधार प्रन्यासद्वारे विचारात घेऊन नंतर प्रस्ताव अंतीम मंजुरीकरिता शासनास सादर करण्यात येईल.

**प्रविण दराडे,**
सभापती,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

नागपूर :
दिनांक १४ सप्टेंबर, २०१२.

---

भाग १-अ (ना.वि.पु.) म.शा.रा. अ.क्र. १५०

BY CHAIRMAN, NAGPUR IMPROVEMENT TRUST

Under Section 39 of the Nagpur Improvement Trust Act, 1936.

**(Khadka-Kirmithi-Shivmadka-Sumthana-Panjri Improvement Scheme, Tah. Hingna, Dist. Nagpur)**

No. DDTP-5299-2012.—

The Government of Maharashtra *vide* Urban Development Department Resolution No. TPS-1899-1191-CR-80-99-UD, dated 23-7-1999 has declared the Nagpur Metropolitan Area and *vide* G.R. No. NIT 2202-4025-CR-493-2002-UD-26, dated 24-12-2002 has extended the area under the jurisdiction of Nagpur Improvement Trust up to the boundaries of the Nagpur Metropolitan Area and the Government of Maharashtra *vide* its G.R., dated 31-8-2010 has appointed the Nagpur Improvement Trust as the 'Special Planning Authority' for Nagpur Metropolitan Area under Section 40 (*1*) & 40 (*1B*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 and the Nagpur Improvement Trust *vide* Board Resolution No. 18/1085, dated 22-2-2010 has resolved to frame the Improvement Scheme in the Nagpur Metropolitan Area by 'Public-participation' Method and whereas N.I.T. *vide* Board Resolution No. 8/1099, dated 30-8-2011 has resolved to prepare Improvement Scheme for area under Mouza Khadka, Kirmiti, Shivmadka, Sumthana, Panjri in Tah. Hingna, Dist. Nagpur for planned and balanced development of these villages and to publish the notice for the same under Section 39 of Nagpur Improvement Trust Act, 1936.

Therefore, it is hereby notified that,—

**A.** The area for the Draft Improvement Scheme which has been framed shall comprise of whole area of Mouza Kirmiti and part of Mouza Shivmadka, Sumthana, Khadka and Panjri of Hingna Taluka to achieve the planned and balanced development of land of this region. The boundary of the area under Improvement Scheme is given below.

**B. North:-** Northern boundary of Khasra Nos. 59, 58, 56, 55, 25, 30, 31, 1, Gaothan 165, 164, 163, 162 of Mouza Khadka and Khasra No. 131 of Mouza Sumthana of Hingna Tahsil.

**South :-** Southern boundary of Mouza Kirmiti of Hingna Taluka and Southern boundary of Khasra Nos. 32, 33, 34/A, 34/B, 35, 36/A, 39, 40, 41, 43, 44, 45, 46, 95, 94, 72, 70 of Mouza Shivmadka.

**East :-** Eastern boundary of Khasra Nos. 131, 130, 129 of Mouza Sumthana of Hingna Taluka and Eastern boundary of Khasra Nos. 147, 146, 145, 144, 143 and 142 of Mouza Khadka of Hingna Taluka and Eastern boundary of S. No. 69 & 70 of Mouza Shivmadka.

**West:-** Western boundary of Mouza Khadka and Mouza Kirmiti of Hingna Taluka and Western boundary of Khasra Nos. 189, 190, 197 and North boundary of Khasra No. 191/1, 191/2 of Mouza Panjari.

**C.** Detailed information regarding the Improvement Scheme, proposed Land Use Map of the draft Improvement Scheme, Development Control Regulations, land on which development charges (net demand) are to be levied and land to be appropriated is available on *www.nitnagpur.org* and also at the following offices on working days during the office hours for the persual of the public.

1. Dy. Director, Town Planning, N.I.T. IInd Floor, Nagpur Improvement Trust, Sadar, Nagpur.
2. Dy. Director, Town Planning, Nagpur Division, Old Secretariat Building, Civil Lines, Nagpur.
3. Assistant Director, Town Planning, Nagpur Branch, Administrative Building No. 1, IInd Floor, Nagpur.
4. Collector Office, Civil Lines, Nagpur.
5. Chief Executive Officer, Zilla Parishad, Nagpur.
6. Tahsildar, Hingna, Tahsil Hingna.

As per the provisions of Section 39 of the Nagpur Improvement Trust Act, 1936, this notice is being published in respect of the above Improvement Scheme. In this regard suggestions/objections are invited from the public at large. The suggestions and objections received within 60 days from the date of first publication of this notice in the *Maharashtra Govt. Gazette* will be only considered by the Dy. Director of Town Planning, Nagpur Improvement Trust and then the proposal will be submitted to the Government for final sanction.

PRAVIN DARADE,
Chairman,
Nagpur Improvement Trust,
Nagpur.

Nagpur :
Dated the 14th September 2012.

---

भाग १-अ (नां.वि.पु.). म.शा.रा. अ.क्र. १५१

## अध्यक्ष, नगर परिषद, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) नुसार किरकोळ फेरबदल करण्याबाबत.**

क्रमांक नपसा-बांध-किरकोळ फेरबदल-७५-२०१२.—

ज्याअर्थी, सावनेर शहराची विकास योजना शासनाने नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग निर्णय क्रमांक टिपीएस-२४००-१८००-युडी-७, दिनांक ३० जून १९८२ अन्वये मंजूर केली असून ती दिनांक १ ऑक्टोबर १९८२ पासून अंमलात आलेली आहे. आणि त्याअर्थी, त्यातील प्रस्तावाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये नगर परिषदेने शासनाचे पत्र क्र. टिपीएस [illegible] प्र.क्र. [illegible]-०९-नवि-१[illegible], दिनांक [illegible] जून २०१२ नुसार आपले दिनांक [illegible] २०१२ च्या न.प. विशेष सभा ठराव क्र. ५ अन्वये खालीलप्रमाण किरकोळ फेरबदल करावयाचे आहे.

"मौजा सावनेर मधील ख.क्र. १,२,३ व ११ आरांजी अनुक्रमे १.०६, १.८२, २.१४ व १.०७ हे. आर नामे अनुक्रमे श्री. जयंत मनोंहरराव खेडकर, प्रदिप मनोहरराव खेडकर व गिरीश मनोहरराव खेडकर यांचे मालकीचे केळवद पांधन रोड लगत पश्चिमेकडील (लिलाश्री लॉन मागील) शेत कृषी क्षेत्रातून वगळून रहिवाशी क्षेत्रात अंतर्भूत करणे."

आणि ज्याअर्थी, उक्त फेरबदल दाखविणाऱ्या नकाशावर अध्यक्ष, नगर परिषद, सावनेर यांनी दिनांक घालून स्वाक्षरी केली आहे. सदर नकाशा नगरपरिषदचे कार्यालयाचे कामकाजाचे वेळात जनतेच्या अवलोकनार्थ खुला ठेवला आहे.

त्याअर्थी, आता जाहीर सूचना देण्यात येते की, सदरहू फेरबदलासंबंधी कोणास काही सूचना अथवा हरकती असल्यास त्या त्यांनी ही जाहीर सूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत अध्यक्ष, नगर परिषद, सावनेर यांचेकडे लेखी सादर कराव्यांत. किरकोळ फेरबदलाबाबत प्रस्ताव विहित मार्गाने शासनाचे मंजुरीकरीता सादर करण्यापूर्वी नागरीकांकडून आलेल्या सूचना व हरकतींचा नगर परिषदेकडून विचार करण्यांत येईल. त्यानंतर आलेल्या सूचना व हरकती विचारात घेतल्या जाणार नाही.

सचिन यादव,
अध्यक्ष,
नगर परिषद, सावनेर.

सावनेर :
दिनांक १ ऑगस्ट २०१२.

---

भाग १-अ (ना.वि.पु.) म.शा.रा. अ.क्र. १५२

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

**Minor Modification Under Section 37(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

No. MCS-Works-Minor Modification-750-2012.—

Whereas, the Development Plan of Saoner Municipal Council prepared under the Provision of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 has been sanctioned by Government of Maharashtra, Urban Development & Public Health Department *vide* their Order No. TPS-2480-1800-UD-7, Dated 30th June 1982 and came into force from 1st Oct. 1982;

And Whereas, Municipal Council, Saoner decided as per the Government Order No. TPS-2408-1585-प्र.क्र-268-09-नवि-9, dated 6-6-2012 *vide* their Special Meeting Resolution No. 5 of dated 29-7-2012, the following Minor Modification in the sanctioned D.P. is proposed.

"Mouza Saoner, Kh. Nos. 1,2,3 and 11, area respectively 1.06, 1.82, 2.14 and 1.07 H.R, land owned respectively by Pradip Manoharrao Khedkar, Girish Manoharrao Khedkar and Jayant Manoharrao Khedkar, situated towards Western side of Kelwad *Pandhan* (Backside of Lilashri Lawn) is in Agricultural Zone, which is to be converted and included in Residential Zone."

A Part Plan showing the proposed modification duly signed and dated by the President, Municipal Council, Soaner is kept open on the Notice Board for the inspection of public during the office hours on all working days.

Now in pursuance of Section 37(*1*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966, it is hence notified that any person's having any objections or suggestions regarding the proposed modification, may communicate in writing to the President, Municipal Council, Saoner within a period of 30 days from the date of Publication of Notification in *Maharashtra Government Gazette*. The suggestions/objections received within the time limit will be considered and decided by Municipal Council, Saoner. Please note that the suggestions/Objections received after the said period will not be considered.

SACHIN YADAV,
President,
Municipal Council, Saoner.

Saoner :
Dated the 1st August 2012.

---

शासकीय मुद्रणालय, नागपूर येथे मुद्रित.